**जलयुक्त शिवार अभियाना"ची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी "शक्ती प्रदत्त समिती" गठीत करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**

**जलसंधारण विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः जशिअ-२०१५/प्र.क्र. ४० /जल-७**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

तारीख : ७ फेब्रुवारी, २०१५

**वाचा -** **शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,**

क्रमांक : जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक: जलअ-२०१४/प्र.क्र.२०९/जल-७,

दि.५ डिसेंबर, २०१४ व शासन शुध्दीपत्रक, दिनांक २८ जानेवारी,२०१५

**प्रस्तावना -**

सर्वांसाठी पाणी- २०१९ पर्यंत टंचाईमुक्त महाराष्ट्र करण्यासाठी व टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी राज्यात हाती घेण्यात आलेल्या उपाय योजनांची एक बाब म्हणून एकात्मिक पध्दतीने नियोजनबध्दरित्या कृती आराखडा तयार करुन पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी राज्यात **"जलयुक्त शिवार अभियान"** ही योजना राबविण्याबाबत शासन निर्णय दि.५ डिसेंबर २०१४ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. **"जलयुक्त शिवार अभियान"** योजनेची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी **"शक्ती प्रदत्त समिती"** गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

सन २०१९ पर्यंत टंचाईमुक्त महाराष्ट्र करण्यासाठी राज्यात **"जलयुक्त शिवार अभियान"** राबविण्याचा निर्णय संदर्भाधीन शासन निर्णय दि.५/१२/२०१४ रोजी अन्वये घेण्यात आला आहे. या अभियाना अंतर्गत दरवर्षी पाच हजार गावे टंचाईमुक्त करण्याबाबत कृषि विभाग,जलसंधारण विभाग,जलसंपदा विभाग,ग्राम विकास विभाग,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,उर्जा विभाग यांच्या विविध योजना एकात्मिक पध्दतीने राबविण्यात येणार आहेत. या योजनेची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी खालीलप्रमाणे **"शक्ती प्रदत्त समिती"** गठित करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| मुख्य सचिव | - | अध्यक्ष |
| अपर मुख्य सचिव (कृषी) | - | उपाध्यक्ष |
| अपर मुख्य सचिव (वित्त) | - | सदस्य |
| अपर मुख्य सचिव (नियोजन) | - | सदस्य |
| प्रधान सचिव (जलसंपदा) | - | सदस्य |
| प्रधान सचिव (लाभक्षेत्र), जलसंपदा विभाग | - | सदस्य |
| प्रधान सचिव (ऊर्जा) | - | सदस्य |
| प्रधान सचिव (ग्राम विकास) | - | सदस्य |
| प्रधान सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) | - | सदस्य |
| सचिव (मदत व पुनर्वसन) | - | सदस्य |
| सचिव (जलसंधारण) | - | सदस्य सचिव |

आवश्यकतेनुसार संबंधित क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींना समितीच्या बैठकीकरिता आमंत्रित करण्याची समितीस मुभा राहील.

दरवर्षी पाच हजार गावे टंचाईमुक्त करण्यासंदर्भात कृषि विभाग,जलसंधारण विभाग,जलसंपदा विभाग, ग्राम विकास विभाग,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व ऊर्जा विभाग यांच्या " जलयुक्त शिवार अभियान" अंतर्गत सर्व कार्यक्रमाची एकात्मिक पध्दतीने आखणी करणे व त्याच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सर्वाधिकार समितीस प्रदान करण्यात येत आहेत.

१. सर्व विभागांनी त्यांच्या विभागातील जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत सर्व योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी अभिसरण (Convergence) करुन कार्यक्रमाची आखणी करणे, उद्दीष्ट निश्चित करणे.
२. उद्दीष्टांची पूर्तता करण्यासाठी/योजनांच्या अंमलबजावणीसाठी निधीची पूरेशी तरतूद करण्यासाठी नियोजन उप समितीला शिफारस करणे.
३. ज्या योजनांसाठी तरतूद अपुरी असेल त्या योजनांसाठी आकस्मिक निधीतून पुरेशी तरतूद उपलब्ध करण्यासाठी मंत्रिमंडळाला विनंती करणे.

४. योजनांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक धोरणात्मक फेरबदल करणे व निधी पुनर्वियोजन करणे.

५. योजनांच्या भौतिक लक्षपूर्तीसाठी या योजनांच्या उद्दीष्ट पूर्तीकरीता निर्गमित केलेल्या कोणत्याही शासन निर्णयामध्ये अथवा वित्तीय अधिकारात आमुलाग्र बदल करणे, व याबाबतची माहिती पुढील मंत्रिमंडळ बैठकीस सादर करणे.

६. निधी उपलब्ध झाल्यानंतर वर्षनिहाय उद्दीष्ट पूर्तीबाबत आढावा घेणे.

७. लोकसहभाग, अभिसरण (Convergence) CSR, अशासकीय संस्थांचा सहभाग इ. बाबींना प्रोत्साहन देणे व राबविणे.

२. दर महिन्याला या कार्यक्रमाचा आढावा घेऊन प्रत्येक कार्यक्रमाचा भौतिक प्रगतीचा अहवाल मा. मुख्यमंत्री महोदयांना सादर करणे.

३. राज्याला टंचाईच्या संकटातून कायमस्वरुपी मुक्त करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियाना अंतर्गत घ्यावयाची कामे प्रपत्र-अ, योजनाबाबत संभाव्य उपलब्ध निधी स्त्रोत प्रपत्र-ब-१, मा. मुख्यमंत्री यांनी जाहीर केलेल्या कायमस्वरुपी उपाययोजना बाबत प्रपत्र-ब-२, वर नमुद केलेल्या १ ते ७ बाबींवर समिती आवश्यक ती कार्यवाही करेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०२०७११५३४३५१२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Prabhakar K Deshmukh

Digitally signed by Prabhakar K Deshmukh
DN: c=IN, o=All India Service, ou=Secretary, postalCode=411007, st=Maharashtra, cn=Prabhakar K Deshmukh
Date: 2015.02.24 15:06:09 +05'30'

**( प्रभाकर देशमुख )**

सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.

२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.

३. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधान परिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. सर्व सन्माननीय विधानसभा/ विधान परिषद व संसद सदस्य.
५. मा.मंत्री (जलसंधारण)यांचेखाजगीसचिव.
६. मा.राज्यमंत्री (जलसंधारण)यांचेखाजगी सचिव.
७. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
८. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुमविभाग, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव , मंत्रालय, मुंबई.
१०.सचिव, महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन), मंत्रालय, मुंबई.
११.आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे-४११ ००१.
१२. सर्व विभागीय आयुक्त.
१३.संचालक (मृदसंधारण), कृषिआयुक्तालय, पुणे-४११ ००१.
१४.प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५.मुख्य अभियंता, लघुसिंचन(जलसंधारण), पुणे
१६.मुख्य अभियंता,विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम,नागपूर.
१७. संचालक, महाराष्ट्र सुदूर सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१८. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१९.मुख्य कार्यकारी अधिकारी/ अप्पर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे.
२०.महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरीता).
२१. सर्व जिल्हाधिकारी.
२२.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी / अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२३. महालेखापाल एक व दोन, महाराष्ट्र राज्य , मुंबई/ नागपूर (लेखा परीक्षा व लेखा व अनुज्ञेयता).
२४.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२५.निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
२६. सर्व उपायुक्त (विकास) ,विभागीय आयुक्त कार्यालय,
२७.सर्व उपायुक्त (रोहयो) ,विभागीय आयुक्त कार्यालय
२८. सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
२९.सर्व अधिक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ,
३०. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी.

३१. सर्व कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण).

३२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,.

३३. सर्व मंत्रालयीन विभाग

३४.सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव/ कार्यासन अधिकारी, ग्रा. वि. व ज. सं. विभाग, मंत्रालय, मुंबई.

३५.नियोजन विभाग/ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

३६.जल-७, निवड नस्ती.

## परिशिष्ट - अ

## शासन निर्णय क्रमांकः जशिअ-२०१५/प्र.क्र.४०/जल-७ , दिनांक ७ फेब्रुवारी, २०१५

## जलयुक्त शिवार अभियाना अंतर्गत हाती घ्यावयाची कामे

१) पाणलोट विकासाची कामे

२) साखळी सिमेंट कॉंक्रीट नाला बंधा-यांची नालाखोलीकरण/रुंदीकरणासह करणे.

३) जुन्या जल संरचनांचे पुनर्जिवन करणे

४) अस्तित्वातील लघुपाटबंधारे संरचनांची (केटी वेअर /साठवण बंधारा) दुरुस्ती करणे

५) पाझर तलाव, लघू सिंचन तलाव दुरुस्ती, नुतनीकरण व क्षमता पुर्नस्थापित करणे (RRR)

६) पाझर तलाव/गाव तलाव/साठवण तलाव/शिवकालीन तलाव/ब्रिटीशकालीन तलाव/ निजामकालीन तलाव/माती नालाबांधातील गाळ काढणे.

७) मध्यम व मोठया प्रकल्पांची सिंचन क्षमतेनुसार प्रत्यक्ष वापर होण्यासाठी उपाय योजना करणे.

८) छोटे ओढे/नालेजोड प्रकल्प राबविणे

९) विहीर/बोअरवेल पुनर्भरण कामे

१०) उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर

११) पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बळकट करणे

१२) पाणी वापर संस्था बळकट करणे

१३) कालवा दुरुस्त करणे

१४) भूजल अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी

## परिशिष्ट - ब-१

## शासन निर्णय क्रमांकः जशिअ-२०१५/प्र.क्र.४०/जल-७ , दिनांक ७ फेब्रुवारी, २०१५

## वेगवेगळया स्तोत्रातून उपलब्ध होऊ शकणारा निधी

| अ.क्र. | कामाचा तपशील | निधी उपलब्ध होऊ शकणा-या योजना | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|
| १ | पाणलोट विकासाची कामे - कंपार्टमेंट बंडींग/ढाळीची बांधबंदिस्ती, शेततळे, मातीचा नाला बांध, सलग समतल चर इ. | IWMP, मनरेगा, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, राज्यस्तर निधी, आदिवासी उपयोजना/बिगर आदिवासी उपयोजना, विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम, विशेष घटक योजना | कृषि, वन व सामाजिक वनीकरण |
| २ | साखळी सिमेंट कॉंक्रीट नाला बांध/नाला खोलीकरण/सरळीकरण/ रुंदीकरण करणे | मा. मुख्यमंत्री सहाय्यता निधी, राज्यस्तर निधी, जिल्हा नियोजन समिती निधी, मा. खासदार/आमदार निधी, विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम, जिल्हा परिषद सेस निधी, अशासकीय संस्था निधी, सहकारी साखर कारखाने CSR व इतर संस्था निधी | कृषि, लघु सिंचन (जलसंधारण) जलसंपदा व जिल्हा परिषद |
| ३ | जुन्या जलसंरचनांचे पुनर्जिवन करणे | मा. मुख्यमंत्री सहाय्यता निधी, राज्यस्तर निधी, जिल्हा नियोजन समिती निधी, जिल्हा परिषद सेस निधी, अशासकीय संस्था निधी, सहकारी साखर कारखाने, CSR, लोकसहभाग, | कृषि, लघु सिंचन (जलसंधारण), जलसंपदा, जिल्हा परिषद |

| | | | |
|---|---|---|---|
| | | यांत्रिकी विभागाकडील उपलब्ध मशिनरी, महात्मा फुले जलभुमी अभियान निधी, मनरेगा, IWMP- प्रेरक प्रवेश उपक्रम निधी | |
| ४ | अस्तित्वातील मृद व जलसंधारण प्रकारच्या संरचनांची, के टी वेअर साठवण बंधारा यांची उपयोगिता वाढविणे | राज्यस्तर निधी, जिल्हा नियोजन समिती निधी, जिल्हा परिषद सेस निधी, अशासकीय संस्था निधी, सहकारी साखर कारखाने, लोकसहभाग | कृषि, लघु सिंचन (जलसंधारण), जिल्हा परिषद व जलसंपदा |
| ५ | मोठया व मध्यम प्रकल्पांची उपयोगिता वाढविणे | राज्यस्तर निधी, जिल्हा नियोजन समिती निधी, अशासकीय संस्था निधी, सहकारी साखर कारखाने, लोकसहभाग | जलसंपदा |
| ६ | छोटे नदी/नाले जोड प्रकल्प | राज्य निधी | जलसंपदा |
| ७ | ल.पा.तलाव/मा.मा.तलाव/ पाझर तलाव/ गाव तलाव/साठवण तलाव/ शिवकालीन तलाव/ ब्रिटीशकालीन तलाव/ निजामकालीन तलाव/माती नाला बांधातील गाळ काढणे. | मनरेगा, लोकसहभाग, सहकारी साखर कारखाने, अशासकीय संस्था, महात्मा फुले जल व भुमी अभियान, विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम | कृषि, लघु सिंचन (जलसंधारण), जिल्हा परिषद व जलसंपदा |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | पिण्याचे पाणी स्त्रोत बळकटीकरण करणे. | जिल्हा परिषद निधी, जिल्हा नियोजन समिती निधी, | पाणीपुरवठा, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, जिल्हा परिषद |
| ९ | विहीर/बोअरवेल पुनर्भरण कामे | मनरेगा, महात्मा फुले जलभुमी अभियान निधी | कृषि, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, जिल्हा परिषद |
| १० | उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर, पीक पद्धतीत बदल | राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन अभियान, राज्य निधी | कृषि व जलसंपदा |
| ११ | कोरडवाहू शेती अभियान अंमलबजावणी (विस्तृत टिपणी परिशिष्ट फ) | राज्यनिधी | कृषि |
| १२ | पाणी वापर संस्था बळकटीकरण | राज्यनिधी व लोकसहभाग | जलसंपदा व जलसंधारण |
| १३ | कालवा स्वच्छता | मनरेगा | जलसंपदा व जलसंधारण |
| १४ | जनजागृती | IWMP, महात्मा फुले जलभूमी अभियान | कृषि |
| १५ | प्रसिद्धी | IWMP, महात्मा फुले जलभूमी अभियान | कृषि |

वेगाने / अस्थायी टाळ्यांच्या सन्मान सचिवालय मुद्रणालय



## परिशिष्ट - ब-२

## शासन निर्णय क्रमांकः जशिअ-२०१५/प्र.क्र.४०/जल-७ , दिनांक ७ फेब्रुवारी, २०१५

## मा. मुख्यमंत्री महोदयांनी जाहिर केलेल्या कायमस्वरुपी उपाययोजना

| अ.क्र. | योजना | संबधित नोडल विभाग |
|---|---|---|
| १ | एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम राबविणे | जलसंधारण विभाग |
| २ | शेततळे व सिमेंट नाला बांधाच्या माध्यमातून विकेंद्रीत पाणीसाठे निर्माण करणे | जलसंधारण विभाग/कृषि विभाग |
| ३ | सोलर पंप शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देणे. | ऊर्जा विभाग |
| ४ | शेतकऱ्यांना सुक्ष्म सिंचन सुविधा उपलब्ध करुन पाण्याचा कार्यक्षम वापर करणे. | कृषी विभाग |
| ५ | सामुदायिक शेततळी घेणे. | कृषी विभाग |
| ६ | पाण्याचे साठे वाढविण्यासाठी गाळ काढण्याचा कार्यक्रम मोठया प्रमाणावर घेणे. | जलसंधारण विभाग |
| ७ | राज्यात कोरडवाहू शेती अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे. | कृषी विभाग |
| ८ | मूळ स्थळ जलसंधारणासाठी ब्रॉड बेड फरो यंत्र (BBF) उपलब्ध करुन देणे. | कृषी व जलसंधारण विभाग (VIIDP) |